महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125
epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. २ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १११ किंमत : ५ रु. | पाने ४

**दिन विशेष...**
१७०० : छत्रपती राजाराम महाराज यांचे निधन.
१५९८ : संत मीराबाई यांचा स्मृतिदिन.
१९४९ : सुप्रसिध्द कवयित्री, संयुक्त प्रांताच्या पहिल्या स्त्री गव्हर्नर सौ.सरोजिनी नायडू यांचे निधन.
१९७२ : अमेरिकेचे पायोनिअर – १० यानाचे गुरुच्या दिशेने उड्डाण झाले.

सेन्सेक्स ८१,२८७.१९ -९६१.४२ (१.१७%)
डॉलर ₹ ९१.०८

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३७ | १६ |
| दिल्ली | ३१ | १६ |
| मुंबई | ३३ | २१ |
| नागपूर | ३६ | १८ |
| पुणे | ३६ | १४ |

**सुविचार**
आपल्या भूतकाळातून शिकून, वर्तमानात जगा आणि भविष्याकडे आशावादाने पाहा.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:४८ संध्या-६:३३

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६३,३५५/- २,९५,०००/-

**केळी भाव**
नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# खामेनींच्या हत्येचा बदला घेणं हा आमचा अधिकार



## इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्किआन यांचे वक्तव्य

**‘इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणच्या सर्वोच्च राजकीय अधिकाऱ्याची आणि जगभरातील शिया धर्माच्या एका प्रमुख नेत्याची हत्या, ही मुस्लिमांविरुद्ध आणि विशेषतः जगभरातील शिया मुस्लिमांविरुद्ध उघडपणे युद्धाची घोषणा मानली जाते’, असं मसूद पेझेश्कियान यांनी म्हटलं आहे. अयातुल्ला अली खामेनी यांच्या उत्तराधिकारी होण्याच्या शर्यतीत अराफी हे प्रमुख आघाडीवर आहेत. ६७ वर्षीय हे एक अनुभवी धर्मगुरू आणि खामेनी यांचे जवळचे सहकारी आहेत. अराफी सध्या सर्वोच्च नेत्याची नियुक्ती करणाऱ्या तज्ञांच्या सभेचे उपाध्यक्ष म्हणून काम करतात. ते इराणच्या मदरसा प्रणालीचेही प्रमुख आहे.**


वृत्तसंस्था । तेहराण

**अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला आहे. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणने आणखी आक्रमक होत इस्त्रायल आणि अमेरिकेच्या हवाई तळांवर प्रतिहल्ले केले आहेत. अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर काही तासांतच इराणने अयातुल्ला अराफी यांची इराणचे अंतरिम सर्वोच्च नेते म्हणून नियुक्ती केली आहे.**

दरम्यान, अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूचा बदला घेण्याचा इशारा आता इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी दिला आहे. ‘खामेनींच्या हत्येचा बदला घेणं हा आमचा कायदेशीर अधिकार आहे’, असं वक्तव्य मसूद पेझेश्कियान यांनी केलं आहे. त्यामुळे आता अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्ध आणखी भडकण्याची चिन्हं आहेत.

इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी म्हटलं की, ‘सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येचा बदला घेणं हे इस्लामिक रिपब्लिकचं हक्क आणि कर्तव्य आहे. इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण या गुन्ह्याच्या गुन्हेगारांचा आणि सूत्रधारांचा बदला घेणं हे कायदेशीर कर्तव्य आणि अधिकार मानतो’, असं मसूद पेझेश्कियान यांनी एका निवेदनात म्हटलं आहे.

### अयातुल्ला अराफी इराणचे नवे सर्वोच्च नेते



**हल्ल्यात अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर आता अयातुल्ला अलीरेजा अराफी यांना तात्पुरते इराणचे नेतृत्व करण्यासाठी नियुक्त करण्यात आलं आहे. अराफी यांना नेतृत्व परिषदेचं कायदेतज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे आणि त्यांना सर्वोच्च नेत्याची भूमिका पार पाडण्याचं काम देण्यात आलं आहे, असे वृत्तसंस्था इराणी स्टुडंट्स न्यूज एजन्सीने दिलं आहे.**

## डोनाल्ड ट्रम्प यांचा इराणला पुन्हा इशारा



इराणच्या इशाऱ्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रतिक्रिया देत पुन्हा अतिशय शक्तिशाली हल्ला करण्याची धमकी इराणला दिली आहे. त्यामुळे आता हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतीच ट्रुथ सोशलवर एक पोस्ट केली. डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं की, ‘इराणने नुकतंच म्हटलं की ते आज खूप मोठा हल्ला करणार आहेत. जो त्यांनी (इस्रायल–अमेरिकेने) यापूर्वी कधीही पाहिला नसेल. मात्र, त्यांनी (इराणने) असं करून नये. कारण जर इराणने असं केलं तर आपण त्यांच्यावर अतिशय शक्तिशाली हल्ला करू, ज्याची पूर्वी इराणने कधीही कल्पना केली नसेल’, असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.

**थोडक्यात**



### पुदुचेरीला पूर्ण राज्याचा दर्जा द्यावा; मुख्यमंत्री एन.रंगासामी

**पुदुचेरी ।** पुदुचेरी या केंद्रशासित प्रदेशाला पूर्ण राज्याचा दर्जा द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री एन.रंगासामी यांनी पंतप्रधानांना घातले. मोदींच्या हस्ते पुदुचेरीतील विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन झाले. त्यासाठी आयोजित सोहळ्यात रंगासामीही सहभागी झाले. त्यांनी पुदुचेरीला पूर्ण सहकार्य करत असल्याबद्दल केंद्र सरकार आणि मोदींचे आभार मानले. अर्थात, मनातील एक खंतही त्यांनी उघड केली. पुदुचेरीला पूर्ण राज्याचा दर्जा मिळण्याची आस आहे. केंद्र सरकारला आग्रह करणारे अनेक ठराव विधानसभेने मंजूर केले. तब्बल १३ वेळा तसे ठराव स्वीकारले आणि केंद्राकडे पाठवले. पुदुचेरी राज्य बनावे अशी जनतेची आकांक्षा आहे.

# सौदीमध्ये अडकले राज्यातील ५० हजार मुस्लिम बांधव!

### सर्वांना सुरक्षित परत आणण्यासाठी हालचाली सुरू

वृत्तसंस्था । मुंबई

**रमजान काळात मक्का–मदीना येथे उमरा या धार्मिक विधीसाठी राज्यातून सौदी अरेबियात गेलेले ५० हजार ते एक लाख मुस्लिम बांधव अडकले असल्याची भीती राज्याच्या अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी व्यक्त केली आहे.**



यावर्षी राज्यातून सुमारे ५०० टूर ऑपरेटर्सनी या धार्मिक विधीसाठी यात्रेकरूंना पाठवले आहे. यापैकी केवळ मुंबईतूनच १०० हून अधिक ऑपरेटर्स सक्रिय असल्याची माहिती आहे. राज्य अल्पसंख्यांक आयोगाने तातडीने हालचाली सुरू करत सर्वांना सुरक्षित परत आणण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. हज यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरूंची नोंद सरकारकडे (पान २ वर)

**सौदी अरेबियात अडकलेल्या महाराष्ट्रातील मुस्लिम बांधवांची संख्या स्पष्ट करण्यासाठी सर्व टूर ऑपरेटर्सशी संपर्क साधण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सोमवारपर्यंत नेमकी संख्या स्पष्ट होईल, असे प्यारे खान यांनी सांगितले.**

# देशव्यापी एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात




### पंतप्रधान मोदींच्या हस्ते पार पडले उद्घाटन


वृत्तसंस्था । दिल्ली

**देशव्यापी एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी शुभारंभ करण्यात आला आहे. अजमेर येथून एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू झाली आहे, ही मोहीम देशाच्या नारी शक्तीला सक्षम बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. भारताच्या नारी शक्तीला सबळ करण्यासाठी आणि माता व मुलींना कॅन्सरमुक्त आरोग्याच्या संरक्षणासाठी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.**

या कार्यक्रमात केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी कर्तव्य भवन येथून दूरदृश्य प्रणालीमार्फत सहभाग घेतला. यानंतर सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये स्थानिक कार्यक्रमांद्वारे एचपीव्ही लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरुद्धच्या भारताच्या लढाईतील एक ऐतिहासिक टप्पा आहे. नरेंद्र मोदी म्हणाले, आपल्या सर्वांना माहित आहे की जेव्हा कुटुंबात आई आजारी पडते तेव्हा संपूर्ण घर विस्कळीत होते. जर आई निरोगी असेल (पान २ वर)

# २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका लांबणीवर

### सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी जुलैमध्ये



वृत्तसंस्था । मुंबई

**आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडलेल्या राज्यातील २० जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका पुढील आदेश होईपर्यंत जाहीर करू नये, असे सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे. या याचिकेवरील पुढील सुनावणी २१ जुलै रोजी होणार असल्याने निवडणुका घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायलयाने दिला तरी या सर्व निवडणुका पावसाळ्यानंतरच ऑक्टोबर वा नोव्हेंबरमध्ये होण्याची अधिक शक्यता आहे.**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या पाच वर्षापासून रखडलेल्या निवडणूका मार्गी लावताना ५० टक्के आरक्षणाची मर्यादा पाळणाऱ्या महापालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याचे आदेश (पान २ वर)

स्थानिक स्वराज्य संस्थामंधील ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाल्याचा मुद्दा निकाली लागेपर्यंत जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेऊ नका, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वीच दिले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षण उल्लंघनाचा मुद्दा निकाली काढण्यासाठी सरन्यायाधीश सुर्य कांत यांच्या अध्यक्षतेखाली न्या.जॉयमाल्या बागची, न्या. विपूल पांचोली अशा तीन न्यायाधिशांचे खंडपीठ गठीत केले आहे. या खंडपीठासमोर आता २१ आणि २२ जुलै रोजी ५० टक्के आरक्षण मर्यादेच्या उल्लंघनाबाबत सुनावणी घेण्याचे न्यायालयाने जाहीर केले आहे. त्यामुळे ही सुनावणी पूर्ण होऊन निकाल लागेपर्यंत जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका होऊ शकणार नाहीत. जुलै, आगस्ट दरम्यान याचा निकाल लागला तरी पावसांमुळे या निवडणुका ऑक्टोबर– नोव्हेंबर पर्यंत होऊ शकणार नाहीत अशी माहिती आयोगातील सूत्रांनी दिली.

# भारतीय कर्मचारी असलेल्या तेल टँकरवर इराणचा भीषण हल्ला

## होर्मुझच्या समुद्रात टँकरवर १५ भारतीय क्रू मेंबर्स असल्याची माहिती आली समोर; चार जखमी

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**अमेरिका आणि इस्रायलने सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी इराणनेही जोरदार प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. ओमानच्या किनाऱ्याजवळील होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या एका तेल टँकरवर इराणने हल्ला केला आहे. यात १५ भारतीय क्रू होते, असंही समोर आलं आहे.**



ओमानच्या दुक्म बंदरावर ड्रोन हल्ल्यानंतर झालेल्या हल्ल्यात पलाऊ ध्वज असलेल्या तेल टँकरवर ओमानच्या मुसंदम द्वीपकल्पात हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात किमान ४ जण जखमी झाले आहेत, असे ओमानच्या सागरी सुरक्षा केंद्राने सांगितले. होर्मुझची सामुद्रधुनी हा जागतिक तेल वाहतुकीसाठी एक धोरणात्मक मार्ग आहे, ज्याला जगातील सर्वात संवेदनशील सागरी अडथळा म्हणून वर्णन केले जाते. काल इराणच्या नौदलाने दिलेल्या रेडिओ इशाऱ्यात असा दावा करण्यात आला होता की, कोणत्याही जहाजाला (पान २ वर)

### ➢ तेल टँकरमधील कर्मचाऱ्यांना काढले बाहेर

**ओमान एमएससीच्या म्हणण्यानुसार, स्कायलाईट नावाच्या या तेल टँकरमध्ये २० जणांचा क्रू होता, ज्यामध्ये १५ भारतीय आणि ५ इराणी नागरिक होते. मुसंदममधील खासाब बंदरापासून साडेनऊ किलोमीटर अंतरावर झालेल्या हल्ल्यानंतर क्रूला बाहेर काढण्यात आले.**

# खामेनी यांच्या मृत्यूचे पाकिस्तानात पडसाद

### अमेरिकन दूतावासावर हल्ला, ८ जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था । इस्लामाबाद

**अमेरिका आणि इस्त्रायलने संयुक्तपणे केलेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचा दावा केला जात आहे. खामेनी यांच्या मृत्यूमुळे इराण आणखी आक्रमक प्रतिहल्ले करत आहे. त्यामुळे आता अमेरिका–इस्त्रायल आणि इराणमधील हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता आहे.**

असं असताना आता अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूचे पडसाद थेट पाकिस्तानात उमटले आहेत. पाकिस्तानच्या कराचीमधील अमेरिकन दूतावासावर जमावाने हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. खामेनी यांच्या मृत्यूमुळे शिया समुदाय आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे. या अनुषंगाने कराची येथील अमेरिकन दूतावासावर काही जमावाने संतप्त होत सुरक्षा व्यवस्था भेदून आतमध्ये प्रवेश करत दगड आणि काठ्यांनी तोडफोड केली आहे. तसेच अमेरिकन दूतावासाच्या कार्यालयाच्या काचा फोडत इमारतीला आग लावण्यात आली आहे. या संपूर्ण घटनेत ८ जणांचा (पान २ वर)

## संपादकीय

### प्रादेशिक हुशारी

लोकसभेची निवडणूक २०२४ मध्ये झाली. त्याच्या काही महिने अगोदर विरोधी पक्ष एकत्र आले होते. त्यांनी देशपातळीवर इंडिया किंवा भारतीय जनता पार्टीच्या भाषेत इंडी नावाची अथवा आयएनडीआयए नामक आघाडी स्थापन केली होती. उद्देश हा होता की केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारला कडवे आव्हान देता यावे. कागदावरची मांडणी असेही दर्शवत होती की आघाडीची मोट घट्ट बांधली गेली तर सत्ता परिवर्तन होऊ शकते. आघाडीचे निमंत्रक कोण आणि नेतृत्व कोणी करायचे यावर तेव्हाही बराच काथ्याकुट झाला. आघाडीची निमंत्रण पत्रिका वाटत फिरणारे बिहारचे मुख्यमंत्री लग्नातल्या जावयासारखे रूसून नंतर आघाडीतूनच बाहेर पडले. ममता बॅनर्जी आणि अखिलेश यादव यांची नावेही नेतृत्वासाठी चालवली गेली. नंतर अखिलेश यांनी स्वत:च्या मर्यादा ध्यानात घेतल्या आणि ममतांच्या नावाला पाठिंबा जाहीर केला. माळ मात्र पडली ती काँग्रेसचे राहुल गांधी यांच्या गळ्यात अन् ते स्वाभाविकही होते. त्याचे कारण राहुल देशभर पसरलेल्या काँग्रेसचे नेते आहेत. प्रादेशिक नेत्यांनी त्यांच्या राज्यातील लोकसभेच्या सर्व जागा जिंकल्या तरीही ते काँग्रेसची बरोबरी करू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे व झालेही तसेच. लोकसभेत काँग्रेसची ताकद वाढली, भाजपची किंचित कमी झाली. मोदींना पंतप्रधान पदापासून रोखण्यात इंडियाला अपयश आले. तेव्हापासून इंडिया आघाडीचे नाव माध्यमातून बादच आहे. अधूनमधून एखाद्या राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी ते डोकावते. ही आघाडी संपली आहे असे सगळे गृहीत धरून चालले आहेत. काँग्रेसच्या चिदंबरमादी बड्या नेत्यांनीही अप्रत्यक्षपणे तसे वर्षभरापूर्वीच सूचित केले. अन्य नेते आणि खुद्द राहुल गांधीही यासंदर्भात काही बोलले नाही. संसदेच्या अधिवेशनाच्या वेळी या कथित आघाडीत जो एकोपा दिसायला हवा होता तोही दिसला नाही. आघाडी जर गंभीरपणे अस्तित्वात आहे तर तिच्या बैठका व्हायला हव्यात. तसे घडलेले दिसले नाही किंवा झालेच असेल तर केवळ एक सोपस्काराचा भाग म्हणून सर्व विधी उरकले गेले. हा झाला आजवरचा प्रवास. इंडिया आघाडीचे पुन्हा स्मरण करण्याचे कारण म्हणजे गेल्या पंधरा दिवसांत ही आघाडी अचानक चर्चेत आली आहे. त्यावर दोन लक्षणीय म्हणता येईल अशा नेत्यांनी भाष्य केले आहे. या नेत्यांनी जी भूमिका मांडली त्याच्याशी असहमती दर्शवणारे भाष्य अन्य दोन नेत्यांनी केले. त्यामुळे आघाडीचा पोपट अजून जिवंत असावा असे वाटू लागले आहे. सुरुवात केली मणिशंकर अय्यर यांनी. त्यांनी इंडिया आघाडीचे नेतृत्व आघाडीतील लहान पक्षांसाठी उपयुक्त आहे, काँग्रेससाठी नाही. ममता बॅनर्जी, स्टॅलिन, अखिलेश अथवा तेजस्वी यादव यांच्याकडे हे पद सोपवले गेले पाहिजे. तसेच ममता बॅनर्जी जर नसतील तर इंडिया आघाडी संपुष्टात येईल असे ते म्हणाले. गेल्या आठवड्याभरात ते बरेच बोलले. त्यातून त्यांनी राहुल गांधी यांच्यावर आणि त्यांच्या निकटवर्तीयांवर थेट टीका केली. यावर मुळात अय्यर आमच्या पक्षातच नाही यास्तव त्यांच्या म्हणण्याला आम्ही भीक घालत नाही अशी भूमिका काँग्रेसच्या नेत्यांनी घेतली. अय्यर शांत पाण्यात दगड भिरकावून पाणी गढूळ करण्यात यशस्वी ठरले. नंतर हीच री तामिळनाडूतील उदयनिधी स्टॅलिन यांनी ओढली. उदयनिधी हे सामान्यत: हिंदू धर्माविरोधात वक्तव्ये करून प्रकाशझोतात असतात. अन्य काही लक्षणीय कामगिरी त्यांनी अद्याप केली नाही. स्टॅलिन यांचे ते पुत्र आहेत आणि त्यांचे राजकीय वारस आहेत ही त्यांची सगळ्यांत जमेची बाजू. करूणानिधी यांनी त्यांच्या हयातीत स्टॅलिन यांना उशिराच आपला उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केले. त्यामानाने उदयनिधींना स्टॅलिन यांनी लवकर संधी दिली. उदयनिधी यांनी त्यांच्या पित्याकडेच इंडियाचे नेतृत्व सोपवले जावे अशी जाहीर मागणी केली आहे. मात्र स्टॅलिन राहुल गांधी यांचे गुणगान करताना हातचे काही राखत नाहीत.

# अंडरपासच्या समस्यांचा लवकरच निपटारा

## आ. अनुप अग्रवाल यांच्या सूचनेनंतर रेल्वे अधिकाऱ्यांकडून पाहणी

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील मोहाडी उपनगरमधील धुळे-चाळीसगाव रेल्वेमार्गावरील अंडरपास नागरिकांना दळणवळणाची यथायोग्य सुविधा देण्याऐवजी अडचणीचा ठरत आहे. या अंडरपासमध्ये कायम साचणारे पाणी, बंद असलेल्या पथदीपांसह अन्य समस्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. या समस्येची शहराचे आ. अनुप अग्रवाल व महापौर मायादेवी परदेशी यांनी दखल घेत रेल्वेच्या अधिकाऱ्यांना ही समस्या सोडविण्याची सूचना केली. त्यानुसार शुक्रवारी (ता. २७) रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करत तातडीने उपाययोजना करून अंडरपास समस्यांमुक्त करण्याची ग्वाही दिली.**



यावेळी भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, नगरसेवक प्रवीण अग्रवाल, विकी परदेशी, ज्येष्ठ नेते विनायक बापूजी शिंदे, विठ्ठल महाराज गावडे, राजेश पवार, भाजपचे तालुकाध्यक्ष प्रवीण पवार, भाजयुमोचे माजी महानगर उपाध्यक्ष ललित वायसे आदी उपस्थित होते.

अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात भारतीय जनता युवा मोर्चाचे माजी महानगर उपाध्यक्ष ललित वायसे यांनी प्रभागाचे नगरसेवक प्रवीण अग्रवाल, राजेश पवार, विकी परदेशी यांच्यासह आ.अनुप अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी तसेच महापालिका आयुक्त नितीन कापडणीस यांना निवेदन देत ही गंभीर स्थिती निदर्शनास आणून दिली.

आ. अग्रवाल, महापौर परदेशी यांनी धुळे येथील रेल्वेस्थानकाचे प्रबंधक संजय जाधव, रेल्वेचे वरिष्ठ मंडळ अभियंता दयाशंकर द्विवेदी, वरिष्ठ विभाग अभियंता सुभाषचंद्रा शर्मा, भूपेंद्र पाटील यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधत संबंधित समस्या तत्काळ दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शहरातील मोहाडी उपनगरतील प्रभाग क्रमांक १६ व १८ यांना जोडणारा रेल्वेमार्गावरील अंडरपास हाच एक मुख्य येण्या-जाण्याचा व रहदारीचा मार्ग आहे. मात्र, शेजारील नाल्यातील पाण्याचा निचरा ते या अंडरपासमध्ये साचते. वारंवार गुडघाभर साचणाऱ्या पाण्यातून वाट काढताना पायी ये-जा करणाऱ्यांसह वाहनधारकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. याशिवाय तेथील पथदीपही बंद असल्याने रात्रीच्या वेळी मार्गस्थ होणाऱ्यांना समस्या तत्काळ सोडविण्याची सूचना केली. रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी द्विवेदी, शर्मा व पाटील यांनी शुक्रवारी (ता. २७) मोहाडी उपनगरातील अंडरपासची पाहणी करत तेथील समस्या जाणून घेतल्या. तसेच ज्या नाल्यातून अंडरपासमध्ये पाणी झिरपते. त्या नाल्याचे पाणी वाहून जाण्यासाठी उपाययोजना करण्यासह साचणारे पाणी उपसण्यासाठी डिझेल पंपऐवजी ऑटोमेशन पद्धतीचा वीजपंप बसविणे, कायमस्वरूपी पथदीप सुरू ठेवणे, अंडरपासमध्ये साचलेली माती, गाळ काढून तेथे स्वच्छता व साफसफाई करणे, आदी उपाययोजना त्वरित करण्याची ग्वाही दिली. याबाबत श्री. द्विवेदी यांच्यासह अधिकाऱ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना तातडीने काम सुरू करण्याच्या सूचनाही दिल्या.

## कर्जाणे येथे भोंगऱ्या सणाचा उत्साहात समारोप

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील कर्जाणे येथे आदिवासी समाजाचा पारंपरिक आणि सांस्कृतिक वारसा जपणारा भोंगऱ्या सण आठवडाभर विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.**



सातपुडा परिसरातील पाड्यांमधील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत पारंपरिक वेशभूषा धारण करून ढोल-ताशांच्या गजरात नृत्य सादर केले. या समारोप सोहळ्यात तरुणाई, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी पारंपरिक पोशाख परिधान करून आपली संस्कृती जपण्याचा संदेश दिला. ढोल, मांदळ आणि पारंपरिक वाद्यांच्या तालावर नाचत-गात गावातून मिरवणूक काढण्यात आली. सातपुडा परिसरातील पाड्यांमधील लोकांनी एकत्र येऊन सणाची परंपरा पुढील पिढीपर्यंत टिकवून ठेवण्याचा संकल्प केला.

समारोप कार्यक्रम शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यामुळे कर्जाणे गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. उपसरपंच प्रमोद बारेला, बबलू बारेला, सुरेश बारेला, सतीश बारेला, धरमसिंग बारेला, पाटील, गिलदार बारेला पाटील नावाड, शुभराम बारेला वरती, जगदीश बारेला गाव वरती, प्रधान बारेला पूजरा व ग्रामस्थ होते.

'आधुनिकतेच्या काळातही आपली ओळख आणि संस्कृती जपणे आवश्यक आहे. भोंगऱ्या सण हा केवळ आनंदाचा उत्सव नसून तो सामाजिक एकता, परंपरा आणि संस्कृतीचे प्रतीक आहे.

**- प्रमोद बारेला**
उपसरपंच, कर्जाणे

## पू. सानेगुरुजी पतपेढीच्या तज्ञ संचालकपदी जितेंद्र ठाकूर यांची बिनविरोध निवड

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सक्रिय तसेच पत्रकारितेमुळे परिचित असलेल्या जितेंद्र ठाकूर यांची पू. सानेगुरुजी माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर पतपेढीच्या तज्ञ संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली.**



या निवडीमुळे पतपेढीच्या कार्याला नवे बळ मिळेल, असा विश्वास सदस्यांनी व्यक्त केला आहे.निवड जाहीर होताच पतपेढीचे अध्यक्ष सुशीलकुमार भदाणे, उपाध्यक्ष महेश पाटील, सचिव सविता बोरसे, खजिनदार मंदाकिनी भामरे तसेच संचालक मंडळातील संजीव पाटील, रोहित तेले, राजेंद्र पाटील, सचिन साळुंखे, आशिष शिंदे, प्रतिभा जाधव, प्रमोद पाटील आदींनी ठाकूर यांचे अभिनंदन केले. व्यवस्थापक सागर पाटील व कर्मचारीवर्गही यावेळी उपस्थित होता. दरम्यान, या निवडीबद्दल आमदार अनिल पाटील, खासदार स्मिता वाघ तसेच माजी आमदार साहेबराव पाटील यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदनपर शुभेच्छा दिल्या. ठाकूर यांच्या अनुभवाचा लाभ पतपेढीच्या पारदर्शक व गतिमान कामकाजासाठी होईल, अशी अपेक्षा सदस्यांकडून व्यक्त होत आहे.

## पान १ वरून

**सौदीमध्ये अडकले राज्यातील......**

अधिकृतपणे होत असते, मात्र उमरा या विधीसाठी जाणाऱ्यांची कोणतीही केंद्रीकृत नोंदणी होत नाही.

बहुतांश यात्रेकरू खासगी टूर अँड ट्रॅव्हल्स ऑपरेटर्सच्या माध्यमातून प्रवास करतात. त्यामुळे नेमका आकडा सांगणे कठीण होत असल्याचे आयोगाने सांगितले आहे. यासंदर्भात आयोग राज्य सरकारच्या संपर्कात असून सर्वांना सुरक्षित परत आणण्यासाठी आवश्यक ती मदत करावी. तसेच या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही संपर्क साधण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**२० जिल्हा परिषदांच्या......**

राज्य निवडणूक आयोगास दिले होते. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने ४२ नगरपंचायती, २४६ नगरपालिकांसह २९ महापालिका आणि १२ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यानंतर आता विदर्भ आणि मराठवाड्यातील उर्वरित २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न सुरू केले होते. त्यानुसार २३ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान सरकारने शिल्लक राहिलेल्या २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका होऊ देण्याची न्यायालयास विनंती केली.

**देशव्यापी एचपीव्ही......**

तर कुटुंब कोणत्याही संकटाचा सामना करण्यास सक्षम राहते. या भावनेतून सरकारने महिलांना आधार देण्यासाठी अनेक योजना राबवल्या आहेत. महिलांच्या आरोग्य आणि प्रतिष्ठेबाबतच्या सरकारच्या संवेदनशील आणि ध्येयवादी दृष्टिकोनावर भर देत, पंतप्रधानांनी स्वच्छता उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात शौचालय बांधकाम, परवडणाऱ्या दरात सॅनिटरी पॅडची उपलब्धता आणि लाखो कुटुंबांसाठी स्वच्छ स्वयंपाक इंधन सुनिश्चित करणाऱ्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजना यासारख्या परिवर्तनकारी उपाययोजनांचा उल्लेख केला. पंतप्रधानांनी सुरक्षित मातृत्व योजनेचा उल्लेख केला, ज्या अंतर्गत गर्भधारणेदरम्यान पौष्टिक अन्नासाठी ५,००० रुपये थेट गर्भवती मातांच्या बँक खात्यात जमा केले जातात. या उपक्रमांमुळे महिलांच्या आरोग्य आणि कल्याणाबाबतच्या दुर्लक्षाऐवजी काळजी, सन्मान आणि संवेदनशीलतेवर आधारित दृष्टिकोन निर्माण झाल्याचे पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

**खामेनी यांच्या मृत्यूचे......**

मृत्यू झाल्याचं सांगितलं जात आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत ाहे. या संदर्भातील वृत्त पाकिस्तानी माध्यमांच्या हवाल्याने इंडिया टुडेनी दिलं आहे.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर सुरू केलेल्या हल्ल्यांच्या विरोधात पाकिस्तानात निदर्शने काढण्यात आले आहेत. या निदर्शनांदरम्यान अमेरिकन दूतावासाबाहेर निदर्शनांना हिंसक वळण लागलं आहे. यावेळी त्या ठिकाणी असलेल्या सुरक्षा रक्षक आणि निदर्शनकर्ते यांच्यात झालेल्या संघर्षात किमान ८ जणांचा मृत्यू झाला असून ३० पेक्षा जास्त जण जखमी झाल्याचं वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान, या घटनेवर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

**भारतीय कर्मचारी असलेल्या......**

अरुंद कॉरिडॉरमधून जाण्याची परवानगी नाही, त्यामुळे हा मार्ग धोक्यात आला. 'सागरी सुरक्षा केंद्राने घोषणा केली आहे की पलाऊचा ध्वज फडकवणाऱ्या तेल टँकरला (स्कायलाईट) मुसंदम गव्हर्नरेटमधील खासाब बंदराच्या उत्तरेस ५ नॉटिकल मैल अंतरावर लक्ष्य करण्यात आले होते आणि टँकरमधील सर्व क्रू सदस्यांना बाहेर काढण्यात आले आहे,' असे एमएससीने एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

तसंच, टँकरला कशाने धडक दिली याचा उल्लेख नाही. अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यांना इराणने प्रत्युत्तर दिल्यानंतर आखाती देश नवीन युद्धात अडकला आहे. त्यामुळे ओमानमध्ये किंवा त्याच्या जवळ लक्ष्यावर हल्ला होण्याची ही पहिलीच वेळ आहे. प्राथमिक माहितीचा हवाला देत केंद्राने पुढे म्हटले आहे की, चार क्रू मेंबर्सना दुखापती झाल्या आहेत आणि त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले आहे.

## नवीन शॉपिंग सेंटरला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' नाव द्या!

### महिला नगरसेविकांची ठाम मागणी; नगरपरिषद प्रशासनासमोर नामकरणाचा मुद्दा ऐरणीवर

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील नगरपरिषदेच्या कार्यालयालगत उभारण्यात आलेल्या नव्या शॉपिंग सेंटरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, अशी जोरदार मागणी महिला नगरसेविका नंदा नरेंद्र संदानशिव व शोभाबाई कढरे यांनी केली आहे.**



या मागणीमुळे शहराच्या राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. नगरपरिषदेकडून जुने संकुल पाडून त्याठिकाणी आधुनिक शॉपिंग सेंटर उभारण्यात आले. मात्र, इमारत पूर्ण होऊन तब्बल आठ ते नऊ वर्षे उलटून गेली तरी अद्याप नामकरणाचा निर्णय झालेला नाही. विशेष म्हणजे, पूर्वी याच ठिकाणी 'डॉ. आंबेडकर शॉपिंग कॉम्प्लेक्स' अस्तित्वात होते. त्यामुळे नव्या वास्तूला देखील पूर्वीप्रमाणेच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर' असे नाव द्यावे, अशी मागणी करण्यात येत आहे. नगरसेविकांनी प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहून तातडीने नामकरण प्रक्रिया पूर्ण करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. शहरातील नागरिक आणि बौद्ध समाज बांधवांकडून या भूमिकेचे स्वागत होत असून, लवकरच नगरपरिषदेत अधिकृत प्रस्ताव मांडला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, या मागणीमुळे आगामी सभेत नामकरणाचा मुद्दा गाजण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

## किसान महाविद्यालयात मराठी भाषा गौरवदिन

प्रतिनिधी । पारोळा

येथील किसान महाविद्यालयात शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात वि.वा. शिरवाडकर लिखित लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी या कवितेच्या वाचनाने करण्यात आली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जी. एच. सोनवणे होते. प्रास्ताविकातून मराठी विभाग प्रमुख डॉ. माणिक बागले यांनी मराठी भाषेच्या प्रवासाची परिपूर्ण माहिती देतांना वि.वा. शिरवाडकर यांच्या जीवनापटावर प्रकाश टाकला.

## वरणगाव स्मशानभूमीजवळ मध्यरात्री अनोळखी महिलेची उपस्थिती; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

### तरुणांनी विचारला जाब; महिला काही न बोलता निघून गेल्याने चर्चेला उधाण


प्रतिनिधी । वरणगाव

**शहरातील विकास कॉलनीजवळील स्मशानभूमी परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास अनोळखी महिला आढळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना तीन-चार दिवसांपूर्वी रात्री ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान घडली.**

मिळालेल्या माहितीनुसार, काही तरुण स्मशानभूमीजवळ गेले असता लोखंडी गेटला टेकून उभी असलेली एक महिला त्यांना दिसली.

अचानक समोर आलेल्या या प्रकारामुळे तरुण भयभीत झाले. त्यांनी इतरांना बोलावून पुन्हा घटनास्थळी येत त्या महिलेला जाब विचारला. तू कुठून आलीस? येथे का उभी आहेस? असे प्रश्न विचारल्यावर संबंधित महिलेने आपण प्रतिभानगरची असल्याचे सांगितले.

मात्र पुढील प्रश्नांना ती कोणतेही स्पष्ट उत्तर देऊ शकली नाही. त्यानंतर उपस्थित तरुणांनी तिला तेथून निघून जाण्यास सांगितले.



वरणगाव शहराची लोकसंख्या सुमारे ४० ते ५० हजारांच्या दरम्यान असून शहरात दोन स्मशानभूमी आहेत. यापैकी विकास कॉलनीजवळील स्मशानभूमीचे काही वर्षांपूर्वी नूतनीकरण करण्यात आले असून रात्रीच्या वेळी लोखंडी गेट लावून ती बंद ठेवली जाते. या घटनेमुळे परिसरात विविध चर्चा रंगल्या आहेत. संबंधित महिला मानसिकदृष्ट्या अस्वस्थ होती का, की अन्य काही कारणाने ती तेथे आली होती, याबाबत नागरिकांत संभ्रम आहे. कोणताही अंधश्रद्धाजन्य प्रकार घडल्याची अधिकृत नोंद नसली तरी पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# गोहामाल पाडा येथे ढोल स्पर्धेचा दणदणाट

## १५० हून अधिक ढोलांचा सहभाग; विजेत्यांना रोख पारितोषिके

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील मेलाणे परिसरातील पेसा गाव गोहामाल पाडा येथे पारंपरिक ढोल स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. तब्बल १५० हून अधिक ढोल पथकांनी सहभाग नोंदवत पहाटेपर्यंत ढोल-ताशांचा निनाद घुमवला.**



कार्यक्रमाची सुरुवात पहाटे सुमारे ४ वाजता होळी दहनाने झाली. पोलिस पाटील नाना पाटील व गाव पाटील गोहमाल पाटील यांच्या हस्ते होळी प्रज्वलित करण्यात आली. त्यानंतर सुरू झालेल्या स्पर्धेने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. टेबल ढोल गटात डेड्यापाडा पथकाने प्रथम क्रमांक पटकावत १० हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले, तर धवली पटेल पाडा पथकाला तृतीय क्रमांकासह ५ हजार रुपये देण्यात आले.

**गाडा ढोल गटात बेलघाट बलवाडी पथकाने प्रथम क्रमांकाचा मान पटकावत १० हजार रुपयांचे बक्षीस जिंकले, तर महाली पाडा पथकाने द्रितीय क्रमांकासह ५ हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले. बक्षीस वितरण अनिल पावरा, गोविंद पावरा, रूमा पावरा व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडले. पारंपरिक ढोल संस्कृती जपणाऱ्या या स्पर्धेमुळे युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे दिसून आले.**

# चाळीसगावात पाच वर्षात जिल्हास्तरीय व्यवस्था : आ.चव्हाण

प्रतिनिधी । चाळीसगाव



**चाळीसगाव शहरासह तालुक्यात पुढील ५० वर्षाच्या दृष्टीकोनातून विकास कामांचे व्हिजन मी आखले आहे. त्यात येत्या काही दिवसात अनेक विकास कामांचे लोकार्पण होणार आहेत, तर अगामी पाच वर्षात चाळीसगाव तालुक्यात जिल्हास्तरीय सुविधा देण्याचा माझा प्रयत्न आहे. त्यासाठी मी रात्र-दिवस काम करीत आहेत, भविष्यात चाळीसगावात अनेक मोठे उद्योग उभे राहतील, असा विश्वास आमदार मंगेश चव्हाण यांनी पत्रपरिषदेत व्यक्त केला.**

आ.मंगेश चव्हाण यांच्या अंत्योदय जनसेवा कार्यालयात दि.२८ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याप्रसंगी नगराध्यक्षा प्रतिभा चव्हाण ह्या देखील उपस्थित होत्या. पुढे माहिती देतांना आ. मंगेश चव्हाण यांनी सांगीतले की, तालुक्यात अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय उभारणीसाठी तब्बल १५० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे.

चाळीसगावमध्ये स्वतंत्र आरटीओ कार्यालय, उपजिल्हा रुग्णालय, अपर जिल्हाधिकारी कार्यालय अशा जिल्हास्तरीय सुविधा उपलब्ध होत आहेत. तसेच शहरासाठी १८ ते २४ महिन्यांचा विकास कामांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. तर उद्योगाच्या दृष्टिकोनातून चाळीसगावसाठी एमआयडीसीचे अतिरिक्त ऑफीस सुरु करण्याचा मानस आहे. तब्बल ७० एकरमध्ये कृषी व पशुवैद्यकिय महाविद्यालय सुरु करणार आहे.

## थोडक्यात

### आयडियल स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**पारोळा ।** येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयडियल इंग्लिश मीडियम स्कूलम ध्ये भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ. तेजोमयी भालेराव. राजीव गांधी इंग्लिश मीडियमचे मुख्याध्यापक हिलाल सुतार तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे चेअरमन डॉ. शांताराम पाटील उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर, मॅनेजिंग डायरेक्टर पंकज पाटील आणि संस्थेचे उपाध्यक्ष संकेत पाटील, उपमुख्याध्यापिका पूजा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारताचे महान वैज्ञानिक सी.व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.
प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रकल्प व प्रयोग सादर केले. पर्यावरण संवर्धन, ऊर्जा निर्मिती, विज्ञानातील नवीन तंत्रज्ञान, तसेच दैनंदिन जीवनातील वैज्ञानिक संकल्पना यांवर आधारित प्रकल्पांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

# चोपड्यात टॅलेंट हंट परीक्षेत १ हजार १२३ विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग



प्रतिनिधी । चोपडा

**येथे टॅलेंट हंट परीक्षेत इयत्ता पहिली, चौथी व सातवीच्या १ हजार १२३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपली क्षमता सिद्ध करण्यासाठी जोर लावला.**

ही परीक्षा दि.१ मार्च रोजी महादेव मंदिर प्रांगणात घेण्यात आली. आयोजन समितीमार्फत सायकल, स्मार्टवॉच व स्टडी टेबल अशी अनेक आकर्षक बक्षिसे त्यांसाठी ठेवण्यात आली आहेत. परीक्षेचे उद्घाटन अडावद सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ यांच्या हस्ते झाले. परीक्षा आयोजनासाठी आयडियल इंग्लिश अकॅडमीचे संचालक पद्माकर पाटील, गुरु क्लासेसचे संचालक अश्विनकुमार चौधरी, समर्थ मॅथ्स सायन्स अकॅडमीचे संचालक घनश्याम पाटील, विशाल मराठे, इलियाज पटेल, दिगंबर पाटील, देवराज सर, दीपक पाटील यांनी परिश्रम घेतले. आयोजकांनी विद्यार्थ्यांसाठी 'टॅलेंट हंट परीक्षा' घेवून परिसरात चांगला उपक्रम राबविला आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना चांगली चालना मिळावी. जेणे करून विद्यार्थ्यांच्या बुध्दिक्षमतेत भर पडेल. विद्यार्थ्यांसाठी पुढेही असेच कार्यक्रम घेण्याची अपेक्षा पालकांनी केली आहे. विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालकवर्गाकडून आयोजकांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

# शिवसेनेचा कुऱ्हा-वराडसिम गटात शिवसंपर्क दौरा

## गावागावांत उत्स्फूर्त प्रतिसाद; जिल्हाप्रमुख समाधान महाजन यांनी ऐकून घेतल्या समस्या

प्रतिनिधी । वरणगाव

**शिवसेनेतर्फे भुसावळ तालुक्यात शिवसंपर्क अभियान राबविण्यात येत असून शनिवारी सायंकाळी कुऱ्हा वाराडसिम या जिल्हा परिषद गटातील गावात दौरा करण्यात आला. यावेळी गावातील नागरिकांच्या समस्या येत्या काळात ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाप्रमुख समाधान महाजन यांनी सांगितले. या शिवसंपर्क अभियान दौऱ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसापासून भुसावळ तालुक्यात शिवसेनेतर्फे शिवसंपर्क अभियान सुरू केले आहे. यापूर्वी तालुक्यातील फुलगाव, कठोरा, सावतर निंभोरा, आचेगाव, पिंपळगाव, सुसरी, तळवेल या ठिकाणी शिवसंपर्क दौरा झाला. दुसऱ्या टप्प्यात शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी कुऱ्हा वारडसिम या जिल्हा परिषद गटात शिव संपर्क अभियान दौरा करण्यात आला.

यामध्ये भीलमडी, मांडवा डीघर, कुऱ्हा, वाराडसिम, गोजोरा, वांजोडा या ठिकाणी भेटी देऊन गावागावांतील समस्या ऐकून घेतल्या. या अभियान दरम्यान नागरिकांकडून लाडकी बहीण योजना सुरू करणारे लाडके बहिणीचे लाडके भाऊ एकनाथ शिंदे यांच्याबद्दल जनमानसात चांगल्या भावना बोलून दाखविल्याचे यावेळी दिसले.

या शिवसंपर्क अभियान दौऱ्यात जिल्हाप्रमुख समाधान महाजन, भुसावळ विधानसभा क्षेत्र प्रमुख संतोष माळी, माजी पंचायत समिती सदस्य गणेश झोपे, शहरप्रमुख दुर्गेश बेदरकर, शैलेश ठाकरे, उप तालुकाप्रमुख जितेंद्र नागपुरे, गजानन पालोदे, संदीप महाजन, भूषण बडगुजर, दिनेश काकडे, पिंटू उंबरकर, अशोक भोई, रवींद्र शिंदे, सागर धनगर, भिलमडीचे बोदराज पवार, नंदू राठोड, कैलास राठोड, मुलचंद जाधव, मांडवा दीघरचे निळकंठ पवार, शिवसेना शाखा प्रमुख राहुल पवार, गोर सेना उपजिल्हाध्यक्ष दिनेश पवार, कैलास जाधव, रवींद्र पवार, कृष्णा राठोड, नीरज पवार, दिलीप पवार, शैलेश ठाकरे, वराडसिमचे रामदास पाटील, समाधान बावस्कर, अजय पाटील, गोकुळ पवार वांजोड्याचे कैलास पाटील, विलास पाटील, गौरव पाटील, जितेंद्र पाटील, संजू पाटील यांच्यासह नागरिक आणि शिवसैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शेठ ला. ना. सार्वजनिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । जळगाव

येथील ना. सार्वजनिक विद्यालयात शनिवार, दि.२८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास मुख्याध्यापक सचिन देशपांडे, उपमुख्याध्यापक प्रशांत जगताप, पर्यवेक्षक संजय वानखेडे, पर्यवेक्षिका रमा तारे, ज्येष्ठ शिक्षक आनंद पाटील, प्राजक्ता गोहिल आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व नोबेल पुरस्कार विजेते डॉ. सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. इयत्ता ९ वी (ब) च्या विद्यार्थिनींनी 'असेच का आणि तसेच का' ही विज्ञानावरील कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.मानस कोष्टी व प्रज्वल साळुंखे यांनी डॉ. सी. व्ही. रमण तसेच 'दैनंदिन जीवनातील विज्ञान' या विषयांवर प्रभावी भाषणे केली. इयत्ता ७ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रयोग सादर करून त्यामागील कार्यकारण भाव स्पष्ट केला. केतन कपाटे, समीर पिंजारी, सचिन पाटील आणि प्रसाद जैन यांनी 'मूलद्रव्य एकमेकांशी कसा संवाद साधतात,' या विषयावर छोटी नाटिका सादर करून रसायनशास्त्रातील संकल्पना प्रभावीपणे मांडल्या.

# करोडपती विद्यालयात शिक्षक बडगुजर यांना सेवानिवृत्तीनिमित्त निरोप

प्रतिनिधी । चोपडा

**येथील कै .हि. मो. करोडपती माध्यमिक विद्यालयात दि. २८ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र रामनाथ बडगुजर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एम.आर.भोईटे होते.**



कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. यानंतर मुख्याध्यापक, माजी मुख्याध्यापक व उपस्थित सर्व शिक्षक बंधू-भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी तसेच माजी विद्यार्थिनी यांच्या हस्ते आर.आर.बडगुजर यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व स्नेह वस्त्र व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या ३३ वर्षाच्या सेवाकाळात त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख करून विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. डी.व्ही. बाविस्कर, श्रीमती व्ही. बी. साळुंखे , श्रीमती सी.पी.बडगुजर, श्रीमती शर्मिला बडगुजर तसेच माजी विद्यार्थिनी करिना शंभरकर या सर्वांनी आर. आर. बडगुजर सरांच्या कार्याचा व विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या विकासासाठी केलेल्या कार्याच्या आठवणींना उजाळा दिला. आर. आर.बडगुजर सरांनी आपल्या मनोगतात संस्था, शाळा सहकारी शिक्षक बंधू-भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या प्रती कृतघ्नता व्यक्त केली.शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक असतो, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात भोईटे सर यांनी बडगुजर सरांविषयी स्नेहभाव व्यक्त केला. त्यांच्या सोबत केलेल्या कार्याच्या आठवणीला उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती दीपाली बडगुजर यांनी केले. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# धरणगाव शहरात श्री सदस्यांकडून स्वच्छता अभियान

## २१३ श्री सदस्यांनी चार क्विंटल कचरा केला संकलन; प्रतिष्ठानाच्या कार्याबद्दल स्तुती

प्रतिनिधी । धरणगाव

**शहरात तसेच तालुक्यात महाराष्ट्र भूषण आ.डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा (ता. अलिबाग) यांच्या सौजन्याने पद्मश्री भूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनातून १ मार्च रोजी महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्ताने धरणगाव तालुक्यात प्रतिमापूजन तसेच स्वच्छता अभियान राबविण्यात आले.**





स्वच्छता अभियानाचे उद्घाटन प्रसंगी लोकनियुक्त नगराध्यक्ष लीला सुरेश चौधरी, गुलाबराव वाघ नंदुरबार व रावेर संपर्कप्रमुख, उपनगराध्यक्ष सुरेख विजय महाजन, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक निलेश चौधरी, माजी नगराध्यक्ष अंजली विसावे, सुनिल चौधरी, प्रियांका जाधव तसेच नगरपालिकेचे नगरसेवक, पदाधिकारी व कर्मचारी तसेच आदी मान्यवरांनी उपस्थिती देऊन प्रतिष्ठानाच्या कार्याबद्दल स्तुती करून स्वच्छता अभियानाबद्दल मार्गदर्शन केले. सदर अभियानात श्री बैठक धरणगाव, श्री बैठक पिंप्री, श्री बैठक बिलखेडा, श्री बैठक पाळधी, श्रीबैठक सोनवद येथील एकूण २१३ सदस्य हजर होते.

त्या श्री सदस्यांनी सकाळी ८ ते १० ह्या वेळेत प्रमुख शासकीय कार्यालय व प्रमुख रस्त्यांचे स्वच्छता अभियान राबवण्यात आले त्यात एकूण ओला कचरा ९८०किलो व कोरडा कचरा ३२५० किलोअसा एकूण ४२३० किलो कचरा जमा केला गेला. त्यासाठी एकूण २१३ श्री सदस्यांनी सहभाग नोंदवला.

# भालोद शाळेत मराठी भाषा गौरवदिन साजरा

प्रतिनिधी । यावल

तालुक्यातील भालोद येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मराठी विषय विभागप्रमुख डी.एस. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा गौरवदिन साजरा करण्यात आला. मराठी भाषा ही अमृतापेक्षाही श्रेष्ठ असून प्रत्येकाने मराठी भाषा संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावा, असे देशमुख यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमात साक्षी भालेराव, कु. अनुराधा जोशी यांनीही आपले वि चार व्यक्त केले. कार्यक्रमास मुख्याध्यापक आर एस. जा वळे, पर्यवेक्षक बी.एन. पाटीलसह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# वर्डी येथे उद्या सद्गुरू सुखनाथबाबांचा पुण्यतिथी महोत्सव

## महाप्रसादासाठी २२०० क्विंटल गहू, ५० क्विंटल तूरदाळ तर ४ ट्राली वांगेचा महाप्रसाद, तालुक्यातून भाविकांची उसळणार गर्दी

प्रतिनिधी । वर्डी, ता.चोपडा



**येथील ग्रामदैवत व महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या समर्थ सद्गुरू सुखनाथबाबा यांच्या ९१ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त मंगळवार दि. ३ मार्च रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादाची परंपरा ९० वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे. या सोहळ्यासाठी महाराष्ट्रासह परराज्यातील भाविक उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतात. सन १९३५ मध्ये फाल्गुन प्रतिपदेला सुखनाथ बाबांनी भक्तांच्या साक्षीने जिवंत समाधी घेतली होती. त्या दिवसापासून दरवर्षी धुलिवंदनाच्या दिवशी या महोत्सवाचे आयोजन केले जाते. सुखनाथबाबा यांनी समाधी घेतल्यानंतर त्यांचे चिरंजीव रघुनाथ बाबा यांनी गादीची परंपरा सांभाळली.**




रघुनाथबाबा यांनीही १९७९ मध्ये वैशाख शुद्ध द्वादशीच्या दिवशी समाधी घेतली. त्यानंतर त्यांचे जावई जगन्नाथबाबांनी गादीची परंपरा सांभाळली. जगन्नाथ बाबा यांनी समाधी घेतल्यानंतर त्यांचे चिरंजीव दीनानाथ महाराज उर्फ भैय्या महाराज यांनी गादी परंपरा सुरू ठेवली आहे. भंडाऱ्याच्या महाप्रसादासाठी २०० क्विंटल गहू, ५० क्विंटल तूरडाळ व साधारणत: चार ट्रॉली वांगी वापरली जाणार आहेत. महाप्रसादासाठी शेकलेली बट्टी, वरण व वांग्याची भाजी असा मेनू असतो. महाप्रसाद तयार करण्यासाठी गावातील सर्व महिला, पुरुष व तरुण मंडळी उत्स्फूर्त सहभाग घेतात. या सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांनी उपस्थित राहावे म्हणून चोपडा आगारातून जादा बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. समाजातील फूट आणि जातीयवाद दूर करून हिंदू समाजाला एकत्र आणण्याच्या उद्देशाने या महाप्रसादाची सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला अत्यंत साध्या पद्धतीने सुरू झालेला हा उपक्रम आज भव्य स्वरूप धारण करून लाखो भाविकांना आकर्षित करतो. गावकऱ्यांच्या स्वयंस्फूर्तीने आणि लोकवर्गणीतून हा उत्सव आयोजित केला जातो. कोणतीही शासकीय मदत न घेता संपूर्ण खर्च गावकरी आणि भक्तगण उचलतात, ही या परंपरेची विशेष बाब आहे.

होळीच्या तयारीसाठी गावात अनेक दिवसांपूर्वीच हालचाली सुरू होतात. तरुण मंडळी जंगलातून लाकूड गोळा करतात. महिला, पुरुष, लहान मुले सर्वजण या तयारीत सहभागी होतात. तीन दिवस गावात उत्सवाचे वातावरण असते.

धुलिवंदनाच्या दिवशी सकाळी ६ वाजता बाबांच्या समाधीला अभिषेक करून मिरवणूक काढली जाते. त्यानंतर भंडाऱ्याचा प्रसाद वाटप केला जातो. महाराष्ट्रासह मध्यप्रदेश आणि गुजरात येथूनही हजारो भाविक या उत्सवाला उपस्थित राहतात. हा उत्सव केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित नसून सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा आहे.

फोडा आणि राज्य करा या विचारसरणीला उत्तर देत वर्डी येथील सुकनाथ बाबा भंडारा हिंदू समाजातील ऐक्याची प्रचिती देतो. समाजात प्रेम, बंधुता आणि एकजूट वाढविण्यासाठी अशा परंपरा महत्त्वपूर्ण ठरत असून वर्डी गावाचा हा उत्सव संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### ➢ असे होईल कार्यक्रम

**सकाळी ७ वाजेला आरती, ८ वाजेला समाधी अभिषेक, ९ वाजेला समाधी स्नान, ११ वाजला होमहवन, दुपारी १२ ते रात्री १२ वाजेपर्यंत महाप्रसाद, यादरम्यान सायंकाळी आरती व पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. महाप्रसाद व पालखी मिरवणुकीचा लाभ घेण्याचे आवाहन भंडारा आयोजन समिती तसेच मठाधिपती दीनानाथ महाराज तसेच पोलिस पाटील पद्माकर महाराज व ग्रामस्थांनी केले आहे.**

## थोडक्यात

### श्री व्यंकटेश माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा

**पारोळा ।** येथील व्यंकटेश माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक उध्दव पाटील होते तर ज्येष्ठ विज्ञान शिक्षक राहुल सूर्यवंशी यांनी डॉ.सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून डॉ. सी. व्ही. रमण यांच्या बद्दल व. 'रमण इफेक्ट' बद्दल विस्तृत अशी माहिती दिली तर अक्षय भोसले यांनी सांगितले कि आज विज्ञानाने विविध क्षेत्रात अनेक संशोधन करून नेत्रदिपक कामगिरी केली आहे.

# वडगावसीम जि. प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना रंगमंच; पालक-गावकऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील वडगावसीम येथील जिल्हा परिषद शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार, दि.२८ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडले.**



विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित या सांस्कृतिक कार्यक्रमाला पालक व गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जयश्री पंकज कोळी, समाधान कोळी, दीपक बाविस्कर तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश सोनवणे यांनी प्रभावीपणे केले.विद्यार्थ्यांनी मराठी, अहिराणी व हिंदी गाण्यांवर आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. रंगीत वेशभूषा, तालबद्ध सादरीकरण आणि आत्मविश्वासपूर्ण अभिनयामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली होती. सत्कार प्रसंगी तालुका पोलिस पाटील अध्यक्ष तसेच गावातील पोलिस पाटील नंदलाल बाविस्कर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका सपना कोळी, कविता कोळी, सुरेश सोनवणे व रोहित निकम यांनी परिश्रम घेतले. केंद्रप्रमुख वैशाली पाटील (रा. गोरगावले) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम नियोजनबद्ध व आनंददायी वातावरणात संपन्न झाला. या स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होऊन शालेय जीवनात नवचैतन्य निर्माण झाल्याचे दिसून आले.

# मजरेहोळ येथे साईबाबा मंदिराचा वर्धापनदिन सोहळा



प्रतिनिधी । चोपडा

**मजरेहोळ येथे साईबाबांच्या मंदिराचा रौप्यमहोत्सव साजरा झाला. यावेळी शोभायात्रेसह पायीदिंडी तसेच सत्यनारायणाची महापलजा करून साईभक्तांना महाप्रसादाचे वाटप केले.**

कीर्तनकार ह.भ.प.विशाल महाराज खोले यांचे श्रवणीय कीर्तनातून श्री साईभक्तांना मंत्रमुग्ध केले. साईभक्त सुनील मराठे आणि ग्रामस्थ यांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते. आसपासच्या ग्रामीण भागातून साईभक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

कार्यक्रमाला माजी विधानसभा अध्यक्ष अरुणभाई गुजराथी यांची विशेष उपस्थिती होती. समितीचे व्यवस्थापक सुनील भिवसन मराठे, दिलीप भिवसन मराठे, हरी भिवसन मराठे, प्रल्हाद भिवसन मराठे, उत्तम भिवसन मराठे यांच्यासह ग्रामस्थांनी सहकार्य केले.

## ● निधन वार्ता

### मच्छिंद्रनाथ सोनगिरे



**चोपडा ।** येथील संताजी नगरातील रहिवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापक मच्छिंद्रनाथ सोनगिरे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, पत्नी, मुलगा, सुन, दोन मुली नातवंडे असा परिवार आहे.

# वरणगाव येथे भटके विमुक्त समाजाची विविध मागण्यासाठी ७ मार्चला बैठक

प्रतिनिधी । वरणगाव

**भटके विमुक्त समाजातील विविध प्रकारच्या अडीअडचणी व त्यांच्या मागण्यांसाठी आणि भुसावळ तालुका व वरणगाव शहर नवीन पदाधिकारी यात प्रामुख्याने ज्यांना समाज कार्याची माहिती तथा आवड असलेल्या युवासमाजसेवक, महिला आघाडी यांची निवड करण्यात येणार असून, तरी भुसावळ तालुक्यातील भटके विमुक्त समाज बांधवानी वरणगाव येथील रेस्ट हाऊस जवळ दि.७ मार्च, शनिवार, वेळ सायंकाळी ६ वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे.**

या बैठकीसाठी जास्तीत जास्त बहुसंख्येने समाज बांधवानी उपस्थित राहावे असे आव्हान भटके विमुक्त बहुजन संघतर्फे जेष्ठ समाजसेवक रविंद्र गायकवाड, अरुण धनगर, भास्कर पालिमकर, भगवान वंजारी, रफीक शेठ पठाण, देविदास गोसावी, सदाशिव भराडी, राजेश गुंमळकर, जितेंद्र भोई, नथु पवार, राजाराम वंजारी, कृष्णा धनगर, भुते कवी, रोहन भुसाडे, रवी पालिमकर, बंडू कपाटे, दुलचंद भोई, प्रकाश गुंमळकर, शंकर पवार, प्रकाश राजपूत, बैरागी सर, त्याचं प्रमाणे महिला आघाडीच्या प्रमुख भारती कापसे, संध्या पवार, सोनिया गायकवाड आदिनी आवाहन केले आहे.

# अनवर्दे खुर्द येथे भागवत कथा सप्ताहाची सांगता

## पालखी मिरवणूक व महाप्रसादाने वातावरण भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले

प्रतिनिधी । चोपडा,

**तालुक्यातील अनवर्दे खुर्द येथे भागवत कथा सप्ताहाचा समारोप भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. सप्ताहानिमित्त गावात पालखी मिरवणूक व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.**



दरवर्षीप्रमाणे यंदाही गावकऱ्यांच्या सहकार्याने भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाच्या सांगतेनिमित्त विठ्ठल-रुक्मिणी मातेची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली.

पारंपरिक वेशभूषेत, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या घोषात संपूर्ण गाव भक्तिरंगात न्हाऊन निघाले. या सोहळ्यासाठी विजय अमृतराव बोरसे, लक्ष्मण संतोष शिरसाट, ज्ञानेश्वर बोरसे, काकासाहेब बोरसे, ह.भ.प.बाळासाहेब महाराज, भटू महाराज आदींनी पुढाकार घेतला. ग्रामस्थांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला. समारोपानंतर गावकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी मोठ्या श्रद्धाभावाने महाप्रसादाचा लाभ घेतला. या सप्ताहामुळे गावात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून समाजात एकोपा, श्रद्धा व भक्तीची भावना अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# जिल्हाभरातील शाळा, कॉलेजात 'विज्ञान दिन' उत्साहात साजरा







शौर्य मराठी चमू

**डॉ. सी.व्हीं. रमण यांनी विज्ञानात क्रांती घडवून आणल्याने त्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यादिवसापासून दि. २८ फेब्रुवारी या दिवशी शाळा, कॉलेजात व महाविदद्ध्याय विज्ञानदिन साजरा करण्यात करण्यात येतो.**

### पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय

**चोपडा ।** येथील पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ डॉ.सी.व्ही. रामण यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. विज्ञान शिक्षक सौरभ कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना 'रामन इफेक्ट'ची सविस्तर माहिती देत त्याचे वैज्ञानिक महत्त्व समजावून सांगितले. तसेच महिला व विज्ञान कॅटेलायझिंग विकसित भारत २०२६' या विषयावर भाष्य करत विज्ञान क्षेत्रातील महिलांचे योगदान अधोरेखित केले. जीवशास्त्र विषयाचे शिक्षक संजय भादले यांनी विज्ञान व जैविक घटक यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करत भविष्यात विज्ञानामुळे मानवी जीवनात क्रांतिकारी बदल घडतील, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमास एन. आर. वाघ, श्रीमती वैशाली चौधरी, अजय सैंदाने, योगराज रायसिंग, जितेंद्र महाजन, गजानन पाटील, वेलसिंग बारेला आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी जिज्ञासा व प्रेरणा निर्माण झाल्याचे दिसून आले.

### शिक्षणशास्त्र महाविद्यालय

**चोपडा ।** एज्युकेशन सोसायटी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चोपडा येथे मराठी भाषा दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य एम. पी. पाटील होते, तर प्रमुख वक्ते म्हणून अंतर्गत गुणवत्ता व्यवस्थापन समितीचे सदस्य गोविंदभाई गुजराथी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मराठी भाषा आणि विज्ञान क्षेत्रातील मान्यवरांच्या स्मरणाने झाली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मराठी भाषेची परंपरा, साहित्य वैभव आणि संस्कारक्षमतेवर विचार मांडले. शुभम शिरसाळे, आशिषकुमार पाटील व शीतल महाजन यांनी मराठीच्या समृद्ध वारशाचा उल्लेख केला. तर दिव्या सपकाळे, शोएब शेख व संजना अस्वार यांनी विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख वक्ते गोविंदभाई गुजराथी यांनी मराठी ही प्रेम, आपुलकी व संस्कारांची भाषा असल्याचे सांगत वाचन संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले. त्यांनी विशाखा, ययाती आणि ज्ञानेश्वरी यांसारख्या साहित्यकृतींचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना समृद्ध साहित्यविश्वाची ओळख करून दिली. अध्यक्षीय भाषणात एम. पी. पाटील यांनी सी. व्ही. रमण यांच्या 'रमण इफेक्ट'चा संदर्भ देत विज्ञानामुळे घडलेली क्रांती व आधुनिक काळातील आव्हाने विद्यार्थ्यांसमोर मांडली. केवळ बौद्धिक नव्हे तर शारीरिक श्रमांचीही गरज असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. डॉ. सविता जाधव यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले, तर आभार प्रदर्शनही त्यांनीच मानले. प्राचार्य डॉ. रजनी सोनवणे, प्राध्यापक व कर्मचारी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला.

### महात्मा फुले हायस्कूल

**धरणगाव ।** येथील महात्मा फुले हायस्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जे. एस. पवार होते. मान्यवरांच्या हस्ते नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी शाळेतील विज्ञान शिक्षक एम. बी. मोरे व व्ही. पी. वऱ्हाडे यांचा अध्यक्षांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. विज्ञान दिनाचे औचित्य साधत अध्यक्षांनी विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतली. या स्पर्धेत इयत्ता सातवीतील रोहन रवी करोसिया याने सर्वाधिक प्रश्नांची अचूक उत्तरे देत रोख १०० रुपयांचे बक्षीस पटकावले. एस. व्ही. आढावे यांनी विज्ञान दिनाचे महत्त्व पटवून देत अल्फ्रेड नोबेल, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व सी. व्ही. रमण यांच्याविषयी सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतात पवार यांनी अंधश्रद्धा व कर्मकांड दूर सारून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचा मूलमंत्र विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन एस.व्ही.आढावे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पी.डी. पाटील यांनी मानले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.